महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

**क्रमांक : २२५३/दिन्यान्यादं/उ.ता./२०२३/१६** **दिनांक :- २२ नोव्हेंबर, २०२३**

# घोषणा

**विषय :-** 'दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग पूर्व परीक्षा - २०२३' या स्पर्धा परीक्षेच्या प्रथम उत्तरतालिकेवरील हरकती केवळ ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **दिनांक १८ नोव्हेंबर, २०२३** रोजी घेण्यात आलेल्या '**दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग पूर्व परीक्षा-२०२३**' (जाहिरात क्रमांक ०४७/२०२३) या स्पर्धा परीक्षेच्या वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या प्रश्नपुस्तिकेच्या चारही संचाच्या प्रथम उत्तरतालिका आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

२. प्रस्तुत परीक्षेसाठी उपस्थित उमेदवारांना उत्तरतालिकेवर हरकती सादर करावयाच्या असल्यास, आयोगाच्या संकेतस्थळावरील **दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ व ०१ जुलै, २०२२** रोजीच्या प्रसिध्दीपत्रकामध्ये नमूद कार्यपध्दतीनुसार केवळ ऑनलाईन पध्दतीने व विहित शुल्काचा भरणा करुन हरकती सादर करणे आवश्यक आहे.

३. विहित ऑनलाईन पध्दती व्यतिरिक्त अन्य कोणत्याही नमुन्यातील अथवा अन्य कोणत्याही मार्गाने/ पध्दतीने सादर करण्यात आलेल्या हरकती तसेच विहित शुल्काचा भरणा न केलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

४. उत्तरतालिकेबाबत हरकती सादर करण्याची सुविधा **दिनांक २७ नोव्हेंबर, २०२३** रोजी **२३.५९** वाजेपर्यंत सुरु राहील.

५. ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यात कोणत्याही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास आयोगाच्या सुविधा केंद्राच्या १८००-१२३४-२७५ व ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर तसेच support-online@mpsc.gov.in या ईमेलवरुन विहित कालावधीत आवश्यक मदत प्राप्त करुन घेता येईल.

परीक्षा नियंत्रक व सहसचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, नवी मुंबई

ठिकाण : नवी मुंबई